क्र.जिपना/शिक्षण/प्राथ/मान्यता/का.क्र.२५/ C604 /२१
कार्यालय जिल्हा परिषद नागपूर
शिक्षण विभाग (प्राथमिक)
दिनांक :- 8 /१२/२०२१

**प्रति**

**अध्यक्ष/सचिव,**
**डिसीग्नो ग्रुप ऑफ एज्यु. सोसा.**
**२०२ दुसरा माळा, अमेआ टॉवर, अँडसेंट शाळा,**
**दिनानाथ हायस्कुल हम्प यार्ड रोड, धंतोली, नागपूर**

**विषय :-** महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वंय अर्थसहाय्यीत तत्वावर सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून नवीन शाळा/दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

**संदर्भ:-** १) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र.१, ६ व २४) २०१२

२) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र.संवय२०१३/(८५/१३) माशि १ दिनांक १५ जुन २०१३

३) मा. शिक्षण उपसंचालक, नापगूर विभाग, नागपूर यांचे कार्यालयील पत्र क्र.प्राथ/ब/ स्वंअर्थ/९२९६/२०१३, दिनांक १३ स्पटेंबर २०१३

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये नवीन शाळा स्थापन करणे/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे करीता प्रस्ताव सादर केला होता. प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार व संदर्भ क्र. ३ अन्वये नवीन शाळा स्थापन करण्याकरिता मान्यता देण्यात आलेली असून या कार्यालयामार्फत खालील नमुद शाळेला अटी व शर्तीवर खाते मान्यतेची परवानगी देण्यात येत आहे.

| अ क्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नांव व पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा/ दर्जावाढ | शाळेचा प्रकार | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नागपूर | डिसीग्नो ग्रुप ऑफ एज्यु. सोसा. २०२ दुसरा माळा, अमेआ टॉवर, अँडसेंट शाळा, दिनानाथ हायस्कुल हम्प यार्ड रोड, धंतोली, नागपूर | ई. पाठशाळा विहीरगांव जि. नागपूर | इंग्रजी | नविन शाळा | प्राथमिक ते उच्च प्राथमिक (इयत्ता १ ली ते ८ वी) | जुन २०१३ पासुन |

**अटी व शर्ती**

१. सदर शाळेने बालकांचा मोफत सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांचे/तरतुदीची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२. संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास परवानगी असेल.

३. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे. त्या वर्गाव्यतिरीक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.

४. व्यवस्थापनास सन २०१३-१४ करिता या शासन निर्णयानुसार पात्र ठरविण्यात आले असल्यास शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहीत नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यानंतर बाबींची पुर्तता करण्यासाठी शासन निर्णयांच्या दिनांकापासुन अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यता दिलेली परवानगी रद्यबातल ठरेल.

५. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस/दर्जावाढ i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच ii) शासनाच्या महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ च्या ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम,** शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

७. ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

८. **यु — डायस डाटा :-** या शसन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U- DISE (Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरतांना, **"स्वंयअर्थसहाय्यीत तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा"** म्हणुन स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषीत करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने सर्व संबधीतांच्या माहितीकरिता, **"स्वंयअर्थसहाय्यीत तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा / दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

९. परवानगी दिलेल्या स्वयं अर्थसहाय्यीत शाळेमध्ये **शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची भरती** शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

तसेच शासनाचे सध्या अस्तिवात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

**(चिंतामण वंजारी)**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, नागपूर**

**प्रतिलीपी :-**

१) मा.अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा. शिक्षण संचालक (प्राथ), शिक्षण संचालनालय, पुणे-१ यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) मा. शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
४) मुख्याध्यापक, ई. पाठशाळा विहीरगांव जि. नागपूर यांना माहितीस रवाना.